श्रीमद् भागवत का यह सार
भगवद् भक्ति ही आधार

# श्रीमद्भागवत रसिक कुटुंब

## UG- 11.17 तृतीय सोपान



स्व धाम प्रस्थान को देखो हो रहे श्रीकृष्ण तैयार ।
उद्धृत किए उद्धव समक्ष अद्भुत अनमोल उद्गार ।।

नारायणं(न्) नमस्कृत्य, नरं(ञ्) चैव नरोत्तमम्।
देवीं(म्) सरस्वतीं(वँ) व्यासं(न्), ततो जयमुदीरयेत्

नामसङ्कीर्तनं(यँ) यस्य, सर्वपापप्रणाशनम्।
प्रणामो दुःखशमनस्, तं(न्) नमामि हरिं(म्) परम्

श्रीमद्भागवतमहापुराणम्
एकादशः स्कन्धः
॥ अथ सप्तदशोऽध्यायः ॥

### उद्धव उवाच

यस्त्वयाभिहितः(फ्) पूर्वं(न्), धर्मस्त्वद्भक्तिलक्षणः ।
वर्णाश्रमाचारवतां(म्), सर्वेषां(न्) द्विपदामपि ॥ 1॥
यथानुष्ठीयमानेन, त्वयि भक्तिर्नृणां(म्) भवेत् ।
स्वधर्मेणारविन्दाक्ष, तत् समाख्यातुमर्हसि ॥ 2॥

उद्धव म्हणाला – हे कमलनयन श्रीकृष्णा ! आपण पूर्वी वर्णाश्रमांचे आचार पाळणाऱ्या माणसांसाठी तसेच सर्वच माणसांसाठी तुमच्या भक्तीचे साधन म्हणून जो धर्म सांगितला होता, त्या त्या स्वधर्माचे अनुष्ठान कसे केल्याने माणसांना आपली भक्ती प्राप्त होईल, ते मला सांगावे.

पुरा किल महाबाहो, धर्मं(म्) परमकं(म्) प्रभो ।

यत्तेन हं(म्)सरूपेण, ब्रह्मणेऽभ्यात्थ माधव ॥ 3॥

हे प्रभो! महाबाहो माधवा! पूर्वी आपण हंसस्वरूपाने ब्रह्मदेवांना परमधर्माचा उपदेश केला होता.

स इदानीं(म्) सुमहता, कालेनामित्रकर्शन ।

न प्रायो भविता मर्त्य- लोके प्रागनुशासितः ॥ 4॥

हे रिपुदमन! पुष्कळ काळ निघून गेल्याकारणी यावेळी पूर्वी सांगितलेला तो धर्म मृत्युलोकातून जवळजवळ नाहीसा झाल्यासारखाच आहे.

वक्ता कर्ताविता नान्यो, धर्मस्याच्युत ते भुवि ।

सभायामपि वैरिञ्च्यां(यँ), यत्र मूर्तिधराः(ख्) कलाः ॥ 5॥

हे अच्युत! ब्रह्मदेवाच्या ज्या सभेहती वेदादिक कला मूर्तिमंत होऊन विराजमान असतात, तेथे सुद्धा आपल्याखेरीज दुसरा कोणीही, आपला हा धर्म तयार करणारा, तो सांगणारा व त्याचे रक्षण करणारा नाही. मग पृथ्वीवर कसा असेल?

कर्त्राविंत्रा प्रवक्त्रा च, भवता मधुसूदन ।

त्यक्ते महीतले देव, विनष्टं(ङ्) कः(फ्) प्रवक्ष्यति ॥ 6॥

हे मधुसूदना! या धर्माचे प्रवर्तक, रक्षण करणारे आणि उपदेशक असे आपणच पृथ्वीवरून निघून गेल्यावर हा लुप्त धर्म कोण सांगेल?

तत्त्वं(न्) नः(स्) सर्वधर्मज्ञ, धर्मस्त्वद्भक्तिलक्षणः ।

यथा यस्य विधीयेत, तथा वर्णय मे प्रभो ॥ 7॥

म्हणून सर्व धर्म जाणणाऱ्या हे प्रभो! आपली भक्ती प्राप्त करून देणारा हा धर्म ज्याला जसा आचरणे योग्य आहे, तसा सांगावा.

श्रीशुक उवाच

इत्थं(म्) स्वभृत्यमुख्येन, पृष्टः(स्) स भगवान् हरिः ।

प्रीतः(ह) क्षेमाय मर्त्यानां(न्), धर्मानाह सनातनान् ॥ 8॥

श्रीशुक म्हणतात – आपल्या भक्तशिरोमणी उद्धवाने जेव्हा असा प्रश्न विचारला, तेव्हा प्रसन्न होऊन भगवान श्रीकृष्णांनी मनुष्यांच्या कल्याणासाठी त्यांना सनातनधर्माचा उपदेश केला.

श्रीभगवानुवाच

धर्म्य एष तव प्रश्नो, नैः(श्)श्रेयसकरो नृणाम् ।

वर्णाश्रमाचारवतां(न्), तमुद्धव निबोध मे ॥ 9॥

भगवान श्रीकृष्ण म्हणाले – हे उद्धवा! तुझा हा धर्मविषयक प्रश्न सर्व वर्णांच्या व आश्रमांच्या माणसांना परम कल्याणस्वरूप असा मोक्षाची प्राप्ती करून देणारा आहे म्हणून मी तुला त्या धर्माविषयी सांगतो.

**आदौ कृतयुगे वर्णो, नृणां(म्) हं(म्)स इति स्मृतः ।**

**कृत्यकृत्याः(फ्) प्रजा जात्या, तस्मात् कृतयुगं(वँ) विदुः ॥ 10॥**

ऐक या कल्पाच्या आरंभी, सत्ययुगात सर्वांचा हंस नावाचा एकच वर्ण होता. त्यावेळी सर्वजण जन्मतःच कृतकृत्य होते. म्हणूनच त्याचे नाव कृतयुग असेही आहे.

**वेदः(फ्) प्रणव एवाग्रे, धर्मोऽहं(वँ) वृषरूपधृक् ।**

**उपासते तपोनिष्ठा, हं(म्)सं(म्) मां(म्) मुक्तकिल्बिषाः ॥ 11॥**

त्यावेळी फक्त प्रणव (ॐकार) वेद होता आणि तपश्चर्या, पावित्र्य, दया व सत्य अशा चार चरणांनी युक्त असा मी बैलाचे रूप धारण केलेला धर्म होतो. त्यावेळेने निष्पाप आणि केवळ तप करणारे लोक शुद्ध अशा माझी उपासना करीत होते.

**त्रेतामुखे महाभाग, प्राणान्मे हृदयात्त्रयी ।**

**विद्या प्रादुरभूत्तस्या, अहमासं(न्) त्रिवृन्मखः ॥ 12॥**

हे उद्धवा! त्रेतायुगाच्या आरंभी माझ्या हृदयातून प्राणांच्या द्वारा ऋग्वेद, यजुर्वेद आणि सामवेद असे तीन वेद प्रकट झाले. त्यांपासून होता, अध्वर्यू व उद्गाता हे कर्मरूप तीन भेद असणाऱ्या यज्ञांच्या रूपाने मी प्रकट झालो.

**विप्रक्षत्रियविट्शूद्रा, मुखबाहूरुपादजाः ।**

**वैराजात् पुरुषाज्जाता, य आत्माचारलक्षणाः ॥ 13॥**

विराट पुरुषाच्या मुखापासून ब्राह्मण, बाहूपासून क्षत्रिय, मांड्यांपासून वैश्य आणि पायांपासून शूद्रांची उत्पत्ती झाली, त्यांचा स्वधर्म हीच त्यांना ओळखण्याची खूण होती.

**गृहाश्रमो जघनतो, ब्रह्मचर्यं(म्) हृदो मम ।**

**वक्षः(स्)स्थानाद् वने वासो, न्यासः(श्) शीर्षणि सं(म्)स्थितः ॥ 14॥**

विराट पुरुषरूप माझ्या जघनभागापासून गृहस्थाश्रम, हृदयापासून ब्रह्मचर्याश्रम, वक्षःस्थळापासून वानप्रस्थाश्रम आणि डोक्यापासून संन्यासाश्रमाची उत्पत्ती झाली.

**वर्णानामाश्रमाणां(ञ्) च, जन्मभूम्यनुसारिणीः ।**

**आसन् प्रकृतयो नृणां(न्), नीचैर्नीचोत्तमोत्तमाः ॥ 15॥**

या वर्ण आणि आश्रमांच्या माणसांचे स्वभाव त्यांच्या जन्माच्या ठिकाणानुसारच उत्तम, मध्यम आणि अधम असे झाले.

**शमो दमस्तपः(श्) शौचं(म्), सन्तोषः(ह) क्षान्तिरार्जवम् ।**

**मद्भक्तिश्च दया सत्यं(म्), ब्रह्मप्रकृतयस्त्विमाः ॥ 16॥**

शम, दम, तपश्चर्या, पवित्रता, संतोष, क्षमाशीलता, सरळपणा, माझी भक्ती, दया आणि सत्य हे ब्राह्मणवर्णाचे स्वाभाविक धर्म होत.

**तेजो बलं(न्) धृतिः(श्) शौर्यं(न्), तितिक्षौदार्यमुद्यमः ।**

**स्थैर्यं(म्) ब्रह्मण्यतैश्वर्यं(ङ्), क्षत्रप्रकृतयस्त्विमाः ॥ 17॥**

तेज, बल, धैर्य, वीरता, सहनशीलता, औदार्य, उद्योगशीलता, स्थिरता, ब्राह्मणभक्ती आणि ऐश्वर्य हे क्षत्रिय वर्णाचे स्वाभाविक धर्म होत.

**आस्तिक्यं(न्) दाननिष्ठा च, अदम्भो ब्रह्मसेवनम् ।**

**अतुष्टिरर्थोपचयैर्- वैश्यप्रकृतयस्त्विमाः ॥ 18॥**

आस्तिकता, दानशूरपणा, दंभ नसणे, ब्राह्मणांची सेवा करणे आणि धनसंचयाने संतुष्ट न होणे, हे वैश्य वर्णाचे स्वाभाविक धर्म होत.

**शुश्रूषणं(न्) द्विजगवां(न्), देवानां(ञ्) चाप्यमायया ।**

**तत्र लब्धेन सन्तोषः(श्), शूद्रप्रकृतयस्त्विमाः ॥ 19॥**

ब्राह्मण, गायी आणि देवतांची निष्कपट भावनेने सेवा करणे आणि त्यातून जे काही मिळेल, त्यात संतुष्ट असणे, हे शूद्र वर्णाचे स्वाभाविक धर्म होत.

**अशौचमनृतं(म्) स्तेयं(न्), नास्तिक्यं(म्) शुष्कविग्रहः ।**

**कामः(ख्) क्रोधश्च तर्षश्च, स्वभावोऽन्तेवसायिनाम् ॥ 20॥**

अपवित्रता, खोटे बोलणे, चोरी करणे, ईश्वर आणि परलोकाची फिकीर न करणे, खोटेनाटे भांडण करणे, काम, क्रोध, लोभ यांच्या आहारी जाणे, हे अंत्यजांचे स्वभाव होत.

**अहिं(म्)सा सत्यमस्तेय- मकामक्रोधलोभता ।**

**भूतप्रियहितेहा च, धर्मोऽयं(म्) सार्ववर्णिकः ॥ 21॥**

सर्व वर्णांसाठी सर्वसाधारण धर्म हेच आहेत की, मन, वाणी आणि शरीराने कोणाचीही हिंसा न करणे, सत्याला अढळ राहणे, चोरी न करणे, काम-क्रोध-लोभापासून दूर राहणे आणि प्राणिमात्रांचे कल्याण होईल, तेच करणे.

**द्वितीयं(म्) प्राप्यानुपूर्व्याज्- जन्मोपनयनं(न्) द्विजः ।**

**वसन् गुरुकुले दान्तो, ब्रह्माधीयीत चाहुतः ॥ 22॥**

ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य यांनी गर्भाधान इत्यादी संस्कारांनी प्रारंभ करून क्रमाने यज्ञोपवीत संस्काररूप दुसरा जन्म प्राप्त करून गुरुकुलात राहावे. तेथे इंद्रियांवर संयम ठेवून आचार्यांनी बोलावल्यावर वेदांचे अध्ययन करावे.

**मेखलाजिनदण्डाक्ष- ब्रह्मसूत्रकमण्डलून् ।**

**जटिलोऽधौतदद्वासोऽ- रक्तपीठः(ख्) कुशान् दधत् ॥ 23॥**

मेखला, मृगचर्म, दंड, रुद्राक्षमाळ, यज्ञोपवीत आणि कमंडलू धारण करावे. डोक्यावर जटा ठेवाव्यात. दंतधावन आणि वस्त्रे धुणे या गोष्टी हौस म्हणून करू नयेत. रंगीत आसनावर बसू नये. आसनासाठी कुश वगैरे घ्यावेत.

**स्नानभोजनहोमेषु, जपोच्चारे च वाग्यतः ।**

**नच्छिन्द्यान्नखरोमाणि, कक्षोपस्थगतान्यपि ॥ 24॥**

स्नान, भोजन, हवन, जप आणि मल-मूत्र त्याग करतेवेळी मौन पाळावे. काख आणि गुदेंद्रियाजवळील केस काढू नयेत. तसेच नखेही कधी काढू नयेत.

**रेतो नावकिरेज्जातु, ब्रह्मव्रतधरः(स्) स्वयम् ।**

**अवकीर्णेऽवगाह्याप्सु, यतासुस्त्रिपदीं(ञ्) जपेत् ॥ 25॥**

पूर्ण ब्रह्मचर्याचे पालन करावे. स्वतः कधीही वीर्यपात करू नये. जर कधी वीर्यस्खलन झालेच, तर पाण्याने स्नान करून, प्राणायाम करून गायत्री मंत्राचा जप करावा.

**अग्न्यर्काचार्यगोविप्र- गुरुवृद्धसुराञ्छुचिः ।**

**समाहित उपासीत, सन्ध्ये च यतवाग् जपन् ॥ 26॥**

ब्रह्मचर्याने पावित्र्य पाळून एकाग्रतेने अग्नी, सूर्य, आचार्य, गाय, ब्राह्मण, गुरु, वृद्धजन आणि देवतांची उपासना करावी. तसेच सायंकाळी आणि प्रातःकाळी मौन धारण करून संध्योपासना व गायत्री मंत्राचा जप करावा.

**आचार्यं(म्) मां(वँ) विजानीयान्- नावमन्येत कर्हिचित् ।**

**न मर्त्यबुद्ध्यासूयेत, सर्वदेवमयो गुरुः ॥ 27॥**

आचार्यांना माझेच स्वरूप मानावे. त्यांचा कधीही अपमान करू नये. त्यांना साधारण मनुष्य समजून त्यांच्याकडे दोषदृष्टीने पाहू नये. कारण गुरु सर्वदेवमय आहेत.

**सायं(म्) प्रातरुपानीय, भैक्ष्यं(न्) तस्मै निवेदयेत् ।**

**यच्चान्यदप्यनुज्ञात- मुपयुं(ञ्)जीत सं(यँ)यतः ॥ 28॥**

सकाळ-संध्याकाळ भिक्षा मागून आणून ती गुरूसमोर ठेवावी. तसेच इतरही गुरुदेवांना अर्पण करावे. त्यांची आज्ञा झाल्यावरच त्याचा उपयोग करावा.

**शुश्रूषमाण आचार्यं(म्), सदोपासीत नीचवत् ।**

**यानशय्यासनस्थानैर्- नातिदूरे कृतां(ञ्)जलिः ॥ 29॥**

आचार्य कुठे जात असतील, तर त्यांच्या मागे मागे चालावे. ते झोपल्यानंतर त्यांच्या जवळपास झोपावे. ते बसले असतील तर त्यांच्या आज्ञेची वाट पाहत, हात जोडून, जवळच उभे राहावे. अशा प्रकारे स्वतःकडे कमीपणा घेऊन शुश्रूषा करून आचार्यांची आज्ञा पालन करण्यात नेहमी तत्पर असावे.

**एवं(वँ)वृत्तो गुरुकुले, वसेद् भोगविवर्जितः ।**

**विद्या समाप्यते यावद्, बिभ्रद् व्रतमखण्डितम् ॥ 30॥**

विद्याध्ययन संपेपर्यंत सर्व सुखोपभोगांपासून दूर राहून गुरुकुलात या प्रकारे वागत राहावे आणि ब्रह्मचर्यव्रत कधीही खंडित होऊ देऊ नये.

यद्यसौ छन्दसां(लँ) लोक- मारोक्ष्यन् ब्रह्मविष्टपम् ।

गुरवे विन्यसेद् देहं(म्), स्वाध्यायार्थं(म्) बृहद्व्रतः ॥ 31 ॥

ब्रह्मचर्याची वेदांच्या निवासस्थानी-ब्रह्मलोकात जाण्याची इच्छा असेल तर त्याने जन्मभर नैष्ठिक ब्रह्मचर्य पाळून वेदांचे अध्ययन करण्यासाठीच आपले संपूर्ण जीवन आचार्यांच्या सेवेमध्येच समर्पित करावे.

अग्नौ गुरावात्मनि च, सर्वभूतेषु मां(म्) परम् ।

अपृथग्धीरुपासीत, ब्रह्मवर्चस्व्यकल्मषः ॥ 32॥

असा ब्रह्मचारी खरोखर ब्रह्मतेजाने संपन्न होतो आणि त्याची सर्व पापे नष्ट होतात. त्याने अग्नी, गुरु, आपले शरीर आणि सर्व प्राण्यांचे ठायी मज परमात्म्याची उपासना करावी. सर्वत्र एकच परमात्मा आहे, असा भाव ठेवावा.

स्त्रीणां(न्) निरीक्षणस्पर्श- सं(लँ)लापक्ष्वेलनादिकम् ।

प्राणिनो मिथुनीभूता- नगृहस्थोऽग्रतस्त्यजेत् ॥ 33॥

ब्रह्मचारी, वानप्रस्थ आणि संन्याशांनी स्त्रीकडे पाहणे, तिला स्पर्श करणे, तिच्याशी बोलणे किंवा थट्टामस्करी करणे इत्यादीपासून लांब राहावे. मैथुन करणाऱ्या प्राण्यांकडे पाहू नये.

शौचमाचमनं(म्) स्नानं(म्), सन्ध्योपासनमार्जवम् ।

तीर्थसेवा जपोऽस्पृश्या- भक्ष्यासं(म्)भाष्यवर्जनम् ॥ 34॥

सर्वाश्रमप्रयुक्तोऽयं(न्), नियमः(ख्) कुलनन्दन ।

मद्भावः(स्) सर्वभूतेषु, मनोवाक्कायसं(यँ)यमः ॥ 35॥

प्रिय उद्धवा! शुचिता, आचमन, स्नान, संध्योपासना, संकल्पणा, तीर्थसेवन, जप, सर्व प्राण्यांच्या ठायी मलाच पाहणे, मन, वाणी तसेच शरीराचा संयम हे नियम सर्व आश्रमांना लागू आहेत. अस्पृश्यांना न शिवणे, अभक्ष्य वस्तू न खाणे आणि ज्यांच्याशी बोलू नये त्यांच्याशी न बोलणे, हे नियमसुद्धा या सर्वांसाठी आहेत.

एवं(म्) बृहद् व्रतधरो, ब्राह्मणोऽग्निरिव ज्वलन् ।

मद्भक्तस्तीव्रतपसा, दग्धकर्माशयोऽमलः ॥ 36॥

नैष्ठिक ब्रह्मचारी ब्राह्मणाने या नियमांचे पालन केल्यामुळे तो अग्नीसारखा तेजस्वी होतो. तीव्र तपश्चर्येमुळे त्याच्या वासना भस्म होऊन जातात. अंतःकरण शुद्ध होते आणि तो माझा भक्त होतो.

अथानन्तरमावेक्ष्यन्, यथा जिज्ञासितागमः ।

गुरवे दक्षिणां(न्) दत्त्वा, स्नायाद् गुर्वनुमोदितः ॥ 37॥

प्रिय उद्धवा! ब्रह्मचारी जर गृहस्थाश्रमात प्रवेश करू इच्छित असेल, तर त्याने विधिपूर्वक वेदाध्ययन संपवून गुरूंना दक्षिणा द्यावी आणि त्यांची अनुमती घेऊन समावर्तन संस्कार करावा.

गृहं(वँ) वनं(वँ) वोपविशेत्, प्रव्रजेद् वा द्विजोत्तमः ।

आश्रमादाश्रमं(ङ्) गच्छेन्, नान्यथा मत्परश्चरेत् ॥ 38॥

त्यानंतर ब्रह्मचर्याने गृहस्थाश्रमात किंवा वानप्रस्थाश्रमात प्रवेश करावा. तो ब्राह्मण असेल तर संन्याससुद्धा घेऊ शकतो किंवा क्रमाने एका आश्रमातून दुसऱ्या आश्रमात प्रवेश करावा. मत्परायण भक्ताने याच्या वेगळ्या प्रकारे वागू नये.

गृहार्थी सदृशीं(म्) भार्या- मुद्वहेदजुगुप्सिताम् ।

यवीयसीं(न्) तु वयसा, तां(म्) सवर्णामनुक्रमात् ॥ 39॥

गृहस्थाश्रमाचा स्वीकार करू इच्छिणाऱ्याने आपल्या अनुरूप व उत्तम लक्षणांनी संपन्न अशा कुलीन कन्येशी विवाह करावा. ती वयाने लहान आणि आपल्या व वर्णाची असावी. अन्य वर्णाची कन्या वरावयाची असल्यास आपल्याहून खालच्या वर्णाची वरावी.

इज्याध्ययनदानानि, सर्वेषां(ञ्) च द्विजन्मनाम् ।

प्रतिग्रहोऽध्यापनं(ञ्) च, ब्राह्मणस्यैव याजनम् ॥ 40॥

यज्ञयाग, अध्ययन आणि दान करण्याचा अधिकार सर्व द्विजांना आहे. परंतु दान घेणे, अध्यापन करणे आणि यज्ञाचे पौरोहित्य करण्याचा अधिकार फक्त ब्राह्मणांना आहे.

प्रतिग्रहं(म्) मन्यमानस्- तपस्तेजोयशोनुदम् ।

अन्याभ्यामेव जीवेत, शिलैर्वा दोषदृक् तयोः ॥ 41॥

दान घेण्यामुळे तपश्चर्या, तेज आणि यश यांचा ह्रास होतो असे वाटले, तर ब्राह्मणाने अध्यापन आणि यज्ञ करविणे यांद्वारेच आपला उदरनिर्वाह करावा. किंवा या दोन वृत्तीमध्येही काही दोष वाटत असेल तर धान्याची कमाई तोडल्यावर शेतात पडलेले किंवा बाजारात पडलेले दाणे वेचून त्यांवर उदरनिर्वाह करावा.

ब्राह्मणस्य हि देहोऽयं(ङ्), क्षुद्रकामाय नेष्यते ।

कृच्छ्राय तपसे चेह, प्रेत्यानन्तसुखाय च ॥ 42॥

ब्राह्मणाचे हे शरीर तुच्छ विषयभोग भोगण्यासाठी नसून जन्मभर कठीण तपश्चर्या करून शेवटी अनंत आनंदस्वरूप अशा मोक्षाची प्राप्ती करून घेण्यासाठीच आहे.

शिलोञ्छवृत्त्या परितुष्टचित्तो,

धर्मं(म्) महान्तं(वँ) विरजं(ञ्) जुषाणः ।

मय्यर्पितात्मा गृह एव तिष्ठन्,

नातिप्रसक्तः(स्) समुपैति शान्तिम् ॥ 43॥

जो ब्राह्मण आपल्या महान धर्माचे निष्कामभावाने पालन करतो आणि शेतात तसेच बाजारात पडलेले-सांडलेले धान्याचे दाणे वेचून त्यांवर संतोषपूर्वक आपला उदरनिर्वाह करतो, त्याचबरोबर आपले सर्वस्व मला समर्पित करून कोठेही आसक्ती ठेवत नाही, तो घरात राहूनही शांतिसहित असे परमपद प्राप्त करून घेतो.

**समुद्धरन्ति ये विप्रं(म्), सीदन्तं(म्) मत्परायणम् ।**

**तानुद्धरिष्ये नचिरा- दापद्भ्यो नौरिवार्णवात् ॥ 44॥**

संकटात सापडून कष्ट सहन करीत असलेल्या माझ्या ब्राह्मण भक्ताला जे संकटातून सोडवितात, त्यांची मी ताबडतोब, समुद्रात बुडणाऱ्यांची नाव जशी सुटका करते तशी सर्व आपत्तीमधून सुटका करतो.

**सर्वाः(स्) समुद्धरेद् राजा, पितेव व्यसनात् प्रजाः ।**

**आत्मानमात्मना धीरो, यथा गजपतिर्गजान् ॥ 45॥**

जसा एक गजराज दुसऱ्या हत्तीचे रक्षण करतो, त्याप्रमाणे राजाने पित्याप्रमाणे आपल्या सर्व प्रजेचे कष्टांपासून रक्षण करावे, त्यांचा उद्धार करावा, आणि धीर-गंभीर राहून स्वतःच स्वतःचा उद्धार करून घ्यावा.

**एवं(वँ)विधो नरपतिर्- विमानेनार्कवर्चसा ।**

**विधूयेहाशुभं(ङ्) कृत्स्न- मिन्द्रेण सह मोदते ॥ 46॥**

अशा प्रकारचा राजा सर्व पापांपासून मुक्त होऊन सूर्याप्रमाणे तेजस्वी विमानात बसून स्वर्गात जातो आणि इंद्राबरोबर सुखोपभोग घेतो.

**सीदन् विप्रो वणिग्वृत्त्या, पण्यैरेवापदं(न्) तरेत् ।**

**खड्गेन वाऽऽपदाक्रान्तो, न श्ववृत्त्या कथं(ञ्)चन ॥ 47॥**

एखादा ब्राह्मण दारिद्र्याने गांजला असेल तर त्याने वैश्यवृत्तीचा आश्रय घेऊन त्या परिस्थितीतून मार्ग काढावा. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीशी झगडावे लागले, तर तलवार हातात घेऊन क्षत्रिय वृत्तीनेही आपला उदरनिर्वाह चालवावा, परंतु कोणत्याही परिस्थितीत नीच लोकांची सेवा करून कुत्र्यासारखे जगू नये.

**वैश्यवृत्त्या तु राजन्यो, जीवेन्मृगययाऽऽपदि ।**

**चरेद् वा विप्ररूपेण, न श्ववृत्त्या कथं(ञ्)चन ॥ 48॥**

याचप्रमाणे प्रजापालनाने क्षत्रिय आपला उदरनिर्वाह करू शकत नसेल, तर त्याने वैश्यवृत्तीने व्यापार करून निर्वाह करावा. अतिशय घोर आपत्ती ओढवली असेल तर त्याने शिकार करून किंवा ब्राह्मणांचा व्यवसाय अध्यापन करून निर्वाह करावा. परंतु नीचांची सेवा करून कुत्र्यासारखे जगू नये.

**शूद्रवृत्तिं(म्) भजेद् वैश्यः(श्), शूद्रः(ख्) कारुकटक्रियाम् ।**

**कृच्छ्रान्मुक्तो न गर्ह्येण, वृत्तिं(लँ) लिप्सेत कर्मणा ॥ 49॥**

प्रतिकूल काळात वैश्याने सुद्धा शूद्रांची वृत्ती-सेवा करून आपला उदरनिर्वाह चालवावा आणि शूद्रांसुद्धा चटया विणणे इत्यादी कामे करून आपले जीवन चालवावे. परंतु प्रतिकूल काळ संपताच कनिष्ठ वर्गाच्या वृत्तीने उदरनिर्वाह करण्याचा लोभ धरू नये.

**वेदाध्यायस्वधास्वाहा- बल्यन्नाद्यैर्यथोदयम् ।**

**देवर्षिपितृभूतानि, मद्रूपाण्यन्वहं(यँ) यजेत् ॥ 50॥**

गृहस्थाने ब्रह्मयज्ञ, पितृयज्ञ, देवयज्ञ, काकबळी, भूतयज्ञ आणि अन्नदानाने अतिथियज्ञ इत्यादींच्या द्वारे मायेमध्ये स्वरूप असणारे ऋषी, देवता, पितर, मनुष्य इत्यादींचे दररोज पूजन करावे.

**यदृच्छयोपपन्नेन, शुक्लेनोपार्जितेन वा ।**

**धनेनापीडयन् भृत्यान्, न्यायेनैवाहरेत् क्रतून् ॥ 51॥**

गृहस्थाने देवाने प्राप्त झालेल्या किंवा न्यायमार्गाने मिळविलेल्या धनाने आपले कुटुंबीय किंवा आश्रयाला असलेले नोकर इत्यादींना कोणत्याही प्रकारे पीडा न देता विधीनुसार यज्ञ करावे.

**कुटुम्बेषु न सज्जेत, न प्रमाद्येत् कुटुम्ब्यपि ।**

**विपश्चिन्नश्वरं(म्) पश्ये- ददृष्टमपि दृष्टवत् ॥ 52॥**

गृहस्थाने कुटुंबामध्ये आसक्त होऊ नये. स्वधर्माचरण व भगवद्भजन करण्याची टाळाटाळ करू नये. बुद्धिमान पुरुषाने या जगातील वस्तूसुद्धा पाण्यातील बुडबुड्याप्रमाणेच पल्लोकातील भोगसुद्धा नाशवानच आहेत, असे समजावे.

**पुत्रदाराप्तबन्धूनां(म्), सं(ङ्)गमः(फ्) पान्थसं(ङ्)गमः ।**

**अनुदेहं(वँ) वियन्त्येते, स्वप्नो निद्रानुगो यथा ॥ 53॥**

स्त्री-पुत्र, आप्तेष्ट इत्यादींचा संबंध पाणपोईवर भेटलेल्या वाटसरूसारखा समजावा. प्रत्येक देहात तो वेगळा असतो. जसे झोप असेपर्यंत स्वप्न असते, तसा हा देह असेपर्यंत संबंध असतात.

**इत्थं(म्) परिमृशन्मुक्तो, गृहेष्वतिथिवद् वसन् ।**

**न गृहैरनुबध्येत, निर्ममो निरहं(ङ्)कृतः ॥ 54॥**

असा विचार करून गृहस्थाने गृहस्थाश्रमात आसक्त होऊ नये. एखादा पाहुणा तात्पुरता राहतो, त्याप्रमाणे राहावे. शरीराबद्दल मीपणा आणि घर इत्यादींमध्ये ममता ठेवू नये, त्याला गृहस्थाश्रम बंधनकारक होत नाही.

**कर्मभिर्गृहमेधीयै- रिष्ट्वा मामेव भक्तिमान् ।**

**तिष्ठेद् वनं(वँ) वोपविशेत्, प्रजावान् वा परिव्रजेत् ॥ 55॥**

भक्ताने गृहस्थोचित शास्त्रोक्त कर्मांनी माझी आराधना करीत घरी राहावे किंवा पुत्रवान असेल तर वानप्रस्थाश्रमात जावे किंवा संन्यास स्वीकारावा.

**यस्त्वासक्तमतिर्गेहे, पुत्रवित्तैषणातुरः ।**

**स्त्रैणः(ख्) कृपणधीर्मूढो, ममाहमिति बध्यते ॥ 56॥**

जे लोक गृहस्थाश्रमात आसक्त असतात, पुत्र, धन इत्यादींच्या इच्छेतच अडकून व्याकुळ होतात, तसेच मूर्खपणाने स्त्रीलंपट आणि कंजूष बनून 'मी-माझे' या भावनेमुळे कर्मबंधनाने बांधले जातात.

**अहो मे पितरौ वृद्धौ, भार्या बालात्मजाऽऽत्मजाः ।**

**अनाथा मामृते दीनाः(ख्), कथं(ञ्) जीवन्ति दुःखिताः ॥ 57 ॥**

ते असा विचार करतात, "अरेरे! माझे आई-वडील वृद्ध झाले आहेत, माझ्या पत्नीची मुले अजून लहान आहेत. माझ्याशिवाय अनाथ, दीन आणि दुःखी झालेले ते कसे जगातील बरे?"

**एवं(ङ्) गृहाशयाक्षिप्त- हृदयो मूढधीरयम् ।**

**अतृप्तस्ताननुध्यायन्, मृतोऽन्धं(वँ) विशते तमः ॥ 58॥**

अशा प्रकारे घरदारासंबंधीच्या वासनांनी ज्याचे चित्त विचलित झालेले असते, तो मूर्ख मनुष्य विषयभोग घेऊन कधी तृप्त होत नाही. आणि त्यांचेच मरणासमयी चिंतन करीत मेल्यानंतर घोर नरकात जाऊन पडतो.

**इति श्रीमद्भागवते महापुराणे पारमहं(म्)स्यां(म्)**

**सं(म्)हितायामेकादशस्कन्धे सप्तदशोऽध्यायः ॥ 17॥**

**ॐ पूर्णमदः(फ्) पूर्णमिदं(म्)पूर्णात्पूर्णमुदच्यते**

**पूर्णस्य पूर्णमादाय पूर्णमेवावशिष्यते ॥**

**ॐ शान्तिः(श्)शान्तिः(श्)शान्तिः ॥**

